| पुणे पोलीस | वाहतुक शाखा, पुणे शहर<br>पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे | पुणे शहर वाहतूक पोलीस PUNE CITY TRAFFIC POLICE |
|---|---|---|

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ४४२२ /२०२४** **दिनांक :- २४/०६/२०२४**

## प्रेसनोट

**विषय :- दिनांक २५/०६/२०२४ रोजी, अंगारक संकष्टी चतुर्थी निमित्त वाहतूक व्यवस्थेत होणा-या बदलाबाबत...**

मंगळवार, दिनांक- २५/०६/२०२४ रोजी अंगारक संकष्टी चतुर्थी असल्याने शिवाजीरोडवरील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदीर येथे दर्शनासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता असुन शिवाजीरोड हा मुख्य वाहतुकीचा एकेरी रस्ता आहे. सदर रस्त्यावर पी.एम.पी.एम.एल. च्या बसेस, चारचाकी व दुचाकी वाहने यांची वर्दळ असते. सदर दिवशी होणाऱ्या मोठ्या गर्दीमुळे रस्त्यावर लोकांना चालणे सुरक्षित होण्याकरीता सदर रस्त्यावरील वाहतुकीवर काही निर्बंध घालणे आवश्यक आहे. त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, रोहिदास पवार, पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन आवश्यकतेनुसार व वेळेनुसार पी.एम.पी.एम.एल. च्या बसेस, चारचाकी व जड वाहने यांना शिवाजी रोडवर येण्यास दि. २५/०६/२०२४ रोजी गर्दी संपेपर्यंत बंदी करण्यात येईल तसेच आवश्यकता वाटल्यास चारचाकी व दुचाकी वाहनांवर लाल महाल चौकापासुन पुढे निर्बंध घातले जातील. वाहतुकीची परिस्थिती पाहून **आवश्यकतेनुसार** खालील स्वरुपात वाहतुकीचे डायव्हर्शन करणे बाबत आदेश पारीत करीत आहे.

सदर कालावधीत खालील पर्यायी मार्गाचा अवलंब करावा.

१) पुरम चौकातून बाजीराव रोडवरुन शिवाजीनगर कडे जाणा-या वाहन चालकांनी पुरम चौकातुन टिळक रोडने - अलका टॉकीज चौक व पुढे एफ सी रोडने इच्छितस्थळी जावे.
२) शिवाजीरोड वरुन स्वारगेटला जाणारे वाहन चालकांनी स.गो. बर्वे चौकातून जंगली महाराज रोडने खंडोजीबाबा चौक -टिळक चौक- टिळक रोडने इच्छितस्थळी जावे.
३) स.गो.बर्वे चौकातून पुणे मनपा भवनकडे जाणारे वाहन चालकांनी स.गो.बर्वे चौकातून जंगली महाराज रोडने झाशी राणी चौक डावीकडे वळून इच्छितस्थळी जावे.
४) अप्पा बळवंत चौकातून बुधवार चौकाकडे जाणाऱ्या वाहन चालकांनी बाजीराव रोडने सरळ पुढे इच्छितस्थळी जावे.

Pawar

**(रोहिदास पवार)**
पोलीस उप आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत** :- १. जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१, स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी.
२. सर्व प्रभारी अधिकारी, वाहतुक शाखा पुणे शहर
३. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, फरासखाना, विश्रामबाग पोलीस स्टेशन पुणे
४. वाहतुक व्यवस्थापक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.